२०० १८९

Har Ghar Jal,
Jal Jeevan Mission

# राज्य पाणी व स्वच्छता मिशन
(SWSM)

१ ला मजला, सिडको भवन (दक्षिण कक्ष),
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

दूरध्वनी क्र. ०२२-२७५६२५४६, २७५६२३६३ ईमेल : wssd-ws06@gov.in

क्र.स्वभामि-२०२३/प्र.क्र.२२/पापु-०६ दिनांक १५जून, २०२३.

वाचा: - १) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.जजमि-२०१९/प्र.क्र.१३८/ पापु-१० (०७), दि.०४.०९.२०२०.

२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.स्वभामि-२०२०/प्र.क्र.१७७/ पापु-१६, दि.११.१०.२०२१

३) केंद्र शासनाचे पत्र क्र.F.No.W.११०४२/१४/२०२३-JJM-I-DDWS, दि.२२.०२.२०२३.

४) केंद्र शासनाचे पत्र क्र.F.No.१८०११/१४/२०२३-SBM-V-DDWS, दि.२३ मार्च, २०२३.

५) शासनाचे पत्र क्र.जजीमिं २०२३/प्र.क्र.१३०/पापु-१०, दि.२३ मे, २०२३.

६) राज्य पाणी व स्वच्छता मिशन चे पत्र क्र.रापास्वमि-०९२०/प्र.क्र.४८ (भाग-II) /पापु-२५ . दि.३१ मे, २०२३.

## परिपत्रक

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक कुटुंबास नळाव्दारे प्रतिमाणशी प्रतिदिन ५५ लिटर स्वच्छ पेयजल पुरविण्याकरिता सन २०२० पासून २०२४ पर्यंतच्या कालावधीमध्ये राज्यात जल जीवन मिशन हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत संपूर्ण राज्य मार्च २०२४ पर्यंत हागणदारी मुक्त अधिक (ODF plus) म्हणून जाहीर करण्याच्या सूचना शासन स्तरावरून प्राप्त आहेत. सद्यस्थितीत ODF plus अंतर्गत एकूण ४०२७० गावांपैकी ६३६२ (१६%) गावे ODF plus म्हणून जाहीर करण्यात आली आहेत. गांवे ODF plus होण्यासाठी गावात प्रामुख्याने सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन इत्यादी कामे पूर्ण होणे आवश्यक आहेत.

२. संदर्भ क्र.३ वरील जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि.२२.२.२०२३ च्या पत्रान्वये जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) च्या अंमलबजावणीकरिता तसेच पाणी पुरवठा योजनांचे स्त्रोत बळकटीकरण, पाणी-स्वच्छता-आरोग्य (Water, Sanitation and Hygine WASH) विषयक बाबीं करिता जिल्ह्यांना सहाय्य करण्यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये दि.३१.०३.२०२४ या कालावधीपर्यंत 'जल शक्ती फेलो' नियुक्त करण्याच्या व त्याकरीता आवश्यक निधी जल जीवन मिशन सहाय्यकृत निधीतून भागविण्याच्या सूचना दिल्या आहेत.

३. राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या शिखर समितीच्या दि.२२ मे, २०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) च्या अधिक प्रभावी अंमलबजावणीकरिता जिल्हा आणि तालुका स्तरावर WASH PMUs द्वारे एकूण ११५५ इतके अतिरिक्त तांत्रिक मनुष्यबळ

Scanned with CamScanner

दि.३१.३.२०२४ पर्यंतच्या कालावधीकरिता उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात आली असून त्याबाबतचा खर्च जल जीवन मिशन सहाय्यकृत निधीतून भागविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

४. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, खालील तक्त्यात दर्शविण्यात आल्यानुसार जीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) च्या अधिक प्रभावी अंमलबजावणीकरिता जिल्हा आणि तालुका स्तरावर एकूण ११५५ इतके मनुष्यबळ त्यांच्यानावासमोर दर्शविलेल्या मानधनावर जल जीवन मिशनचा कालावधी दि.३१.३.२०२४ पर्यंत बाह्यस्थ यंत्रणेमार्फत उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे-

| अ. क्र. | स्तर | मनुष्यबळ | मनुष्यबळ प्रति तालुका/ जिल्हा | एकुण मनुष्यबळ | मानधन प्रतिमाह प्रति मनुष्यबळ (GST व सेवा शुल्क वगळून) |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा | District Water and Sanitation Management Consultant | २ | ६८ | ३५००० |
| २ | जिल्हा | Data Entry Operator | १ | ३४ | १६००० |
| ३ | तालुका | District Water and Sanitation Management Consultant | २ | ७०२ | २२००० |
| ४ | तालुका | Data Entry Operator | १ | ३५१ | १२००० |
| | | एकुण | | ११५५ | |

सदर प्रकरणी सेवा शुल्क व GST लागू असल्यास प्रचलित दराने सेवा शुल्क व GST अनुज्ञेय राहील.

५. उपरोक्त मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी केंद्र शासनाचे General Financial Rule, २०१७ (GFR) अंतर्गत नियम क्रमांक १७७ ते १९६ आणि "Manual for Procurement of Consultancy and Other Services २०२२" मधील तरतुदींनुसार बाह्यस्थ यंत्रणेची नियुक्ती करण्याची कार्यवाही करावी.

६. प्रस्तुत पदांच्या मानधनाचा खर्च जल जीवन मिशन अंतर्गत प्राप्त होणाऱ्या सहाय्यकृत बाबी या घटकातून अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(प्रदिपकुमार डांगे)
मिशन संचालक,
स्वच्छ भारत मिशन (ग्रा.)

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२) प्रकल्प व्यवस्थापक तथा सहसंचालक (वित्त), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.

Scanned with CamScanner

३) अवर सचिव (पापु-२५/पापु-१०), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई
४) प्रकल्प संचालक, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद (सर्व)

प्रत,

१) मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३) मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४) सहसचिव (पापु-१६/१०/०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५) मिशन संचालक (जल जीवन मिशन/ स्वच्छ भारत मिशन) यांचे स्वीय सहाय्यक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई
६) लेखाधिकारी (जजीमि/स्वभामि), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई
७) निवडनस्ती ( कार्यासन पापु-०६).

Scanned with CamScanner

राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई कार्यालयाचे परिपत्रक क्र.स्वभामि-२०२३/प्र.क्र.२२/पापु-०६, दिनांक १५ जून, २०२३ सोबतचे परिशिष्ठ-अ

अटी व शर्ती :-

१) बाह्यस्थ: यंत्रणेमार्फत WASH PMUs व्दारे घेण्यात येणाऱ्या प्रस्तुत ११५५ तांत्रिक मनुष्यबळाचे संनियंत्रण संबंधित प्रकल्प संचालक, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद यांच्याकडे राहील.

२) प्रस्तुत मनुष्यबळाच्या किमान अर्हता व अनुभव आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे राहतील-

| अ. क्र. | मनुष्यबळ | किमान अर्हता | किमान अनुभव | कर्तव्ये व जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| अ) | जिल्हास्तर | | | |
| १ | जिल्हा पाणी व स्वच्छता व्यवस्थापन सल्लागार | बी.ई./ डिप्लोमा (सिव्हील) | बी.ई. पदवी धारक - किमान २ वर्षे / डिप्लोमा पदविकाधारक -किमान ५ वर्षे | ग्रे वॉटर व्यवस्थापन व पाण्याच्या स्त्रोतांचा शाश्वत विकास यांच्या अनुषंगाने जिल्हा स्तरावरील यंत्रणांना सहाय्य करणे. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, सांडपाणी आणि घनकचरा व्यवस्थापन, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन इत्यादी योजना तयार करण्यासाठी गावांना मदत करणे, सुरू असलेल्या विविध कामांची तांत्रिकदृष्ट्या पाहणी करणे, कामांच्या गुणवत्तेचे निरीक्षण करणे, अंमलबजावणीशी संबंधित विविध यंत्रणा आणि ग्रामपंचायत यांना मार्गदर्शन करणे, इ. जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांनी सोपविलेले इतर कोणतेही काम/कार्ये पार पाडणे. |
| २ | डेटा एंट्री ऑपरेटर | पदवीधारक व MSCIT कोर्स पुर्ण असावा | किमान १ वर्ष | टिप्पण्या आणि पत्रे टंकलिखीत करणे, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावरील विविध माहितीचे संकलन करणे, MIS प्रणालीमध्ये सर्व माहिती भरणे, आवश्यकतेनुसार अहवाल तयार करणे, संबंधित अधिकाऱ्यांनी नेमून दिलेली इतर कोणतेही कामे/कार्ये पार पाडणे. |

Scanned with CamScanner

113

| अ. क्र. | मनुष्यबळ | किमान अर्हता | किमान अनुभव | कर्तव्ये व जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ब) | तालुकास्तर | | | |
| ३ | तालुका पाणी व स्वच्छता व्यवस्थापन सल्लागार | बी.ई./ डिप्लोमा (सिव्हील) | बी.ई. पदवी धारक - किमान १ वर्षे / डिप्लोमा पदविकाधारक -किमान १ वर्षे | ग्रे वॉटर व्यवस्थापन व पाण्याच्या स्त्रोतांचा शाश्वत विकास यांच्या अनुषंगाने तालुका स्तरावरील यंत्रणांना सहाय्य करणे. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, सांडपाणी आणि घनकचरा व्यवस्थापन, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन इत्यादी योजना तयार करण्यासाठी गावांना मदत करणे, सुरू असलेल्या विविध कामांची तांत्रिकदृष्ट्या पाहणी करणे, कामांच्या गुणवत्तेचे निरीक्षण करणे, अंमलबजावणीशी संबंधित विविध यंत्रणा आणि ग्रामपंचायत यांना मार्गदर्शन करणे, इ. जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांनी सोपविलेले इतर कोणतेही काम/कार्ये पार पाडणे. |
| ४ | डेटा एंट्री ऑपरेटर | पदवीधारक व MSCIT कोर्स पुर्ण असावा | किमान १ वर्ष | टिप्पण्या आणि पत्रे टंकलिखीत करणे, तालुका आणि ग्रामपंचायत स्तरावरील विविध माहितीचे संकलन करणे, MIS प्रणालीमध्ये सर्व माहिती भरणे, आवश्यकतेनुसार अहवाल तयार करणे, संबंधित अधिकाऱ्यांनी नेमून दिलेली इतर कोणतेही कामे/कार्ये पार पाडणे |

३) प्रस्तुत मनुष्यबळाने प्रत्येक महिन्याच्या शेवटी त्यांनी केलेल्या कामाच्या अनुषंगाने स्वयंमूल्यमापन अहवाल संबंधित प्रकल्प संचालक, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद यांना सादर करावा.

४) मनुष्यबळ पुरवठादाराने नेमलेल्या प्रस्तुत बाह्यस्थ: मनुष्यबळास उपस्थित वीस दिवसांकरिता एक याप्रमाणे अर्जित रजा व प्रति वर्ष ८ किरकोळ / नैमित्तीक रजा अनुज्ञेय असतील. वर्षाअखेरीस मनुष्यबळाच्या रजा खाती शिल्लक राहिलेल्या रजांच्या अनुषंगाने कोणतेही मानधन अनुज्ञेय राहणार नाही. तसेच, सदर शिल्लक रजा संपुष्टात येतील, त्या पुढील वर्षामध्ये जमा करण्यात येणार नाहीत.

Scanned with CamScanner

५) प्रस्तुत मनुष्यबळास सदर परिपत्रकान्वये मंजूर बाह्यस्थ: यंत्रणेमार्फत देण्यात येणाऱ्या मानधनाव्यतिरिक्त अन्य कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

६) प्रस्तुत मनुष्यबळास पुरवठादार संस्थेचे ओळखपत्र देण्यात यावे. त्यांना शासकीय कार्यालयाचे कोणतेही ओळखपत्र देण्यात येवू नये.

७) प्रस्तुत मनुष्यबळाची उपस्थिती नोंदविण्याकरिता पुरवठादार संस्थेने बायोमेट्रीक यंत्रणा उपलब्ध करून देण्यात यावी व त्याआधारेच उपस्थिती ग्राह्य धरण्यात यावी.

८) प्रस्तुत मनुष्यबळाचा कालावधी दि.३१.३.२०२४ पर्यंत राहील. सदर मनुष्यबळ बाह्यस्थ: यंत्रणेमार्फत नियुक्त करण्यात येत असल्याने सदर मनुष्यबळास कोणत्याही स्वरुपाची मानधनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

(प्रदिपकुमार डांगे)
अभियान संचालक,
स्वच्छ भारत मिशन (ग्रा.)

Scanned with CamScanner